निर्मला देशपांडे

# पौर्णिमेचा चंद्र



MR 028.5 D
459 P

MR
028.5
D459 P

पॉप्युलर प्रकाशन

पौर्णिमेचा चंद्र

पहिली आवृत्ती १९६८/१८८९

Paurnimecha Chandra
Nirmala Deshpande
1968

©
निर्मला देशपांडे

चित्रकार
अनंत सालकर

Library IIAS, Shimla
MR 028.5 D 459 P
00055450
MR
028.5
D459 P
55450
15.11.76

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.
नारायण पेठ पुणे २

प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव
मुंबई ३४ WB

Popular
Bombay

किंमत
दोन रुपये

CATALOGUED



# पौर्णिमेचा चंद्र

पौर्णिमेचा चंद्र आला, सईच्या घरी
म्हणे " हे चांदीचं, ताट घे करी "

पौर्णिमेचा चंद्र म्हणे, " सई गळ्यात घाल
तुझ्यासाठी आणलेली, मोत्यांची माळ ! "

पौर्णिमेचा चंद्रमा, खिडकीमधुन बोले,
" सई तुला आणलेत, जरतारी शेले.... "

पौर्णिमेचा चंद्र म्हणे, दाराच्या आडून,
" सई तुला बिलोरी, आरसा देइन धाडून "

जाता जाता चंद्रमा, बघे समुद्रात
बिलोरी आरशाचे, तुकडे झाले सात

समुद्रानंच त्याचा, कापला होता गळा,
दिवसेंदिवस चंद्रमा, सुकतच गेला....



# झुरळ

राजूला आमटीत, झुरळ दिसलं
चिमटीत पकडून, आईनं फेकलं

आई म्हणाली “ गूपचूप !
जेवणावर ताव मार खूप ”

सारेच म्हणतील “हा प्रकार नवा,
राजूलाच का म्हणून ? आम्हालाही हवा.... ”

# घारी ग घारी !

घारी ग घारी, ये माझ्या घरी
तुझ्यासाठी शिवली, चोळी जरतारी

" आकाशाची कमान, झालीय् काळी,
पंखांनी झाडिन, कोळ्यांची जाळी. "

मोरा रे मोरा, तुला मोत्याचा चारा,
पिसांच्या पंख्यानं घाल मला वारा !

" पिसांवरले रुपये मोजून घेतो,
ढगातल्या विजेचा, पंखा घेऊन येतो. "

कावळ्या रे कावळ्या, खिडकीत बसून
येणाऱ्या पाहुण्याचा सांग मला शकून

" साबण टॉवेल, घेतला नवा
चंद्रावरचा डाग, पुसायला हवा.... "





# बाहुलीचं लगीन

आज दुपारचा आहे, आहे लगीन मुहूर्त
तिन्हिसांजेच्या वेळेला, बाई निघेल वरात

चला करा लगबग, नेसा साड्याचोळ्या नव्या
आज केसात माळाया, वेण्या शेवंतीच्या हव्या

नीट सजवा ग ! माझ्या लाडक्या बाहुलीला
मैना सासऱ्यासी जाते, गाय जशी दावणीला

गूळ खोबऱ्याचे झाले बाई ! रुकवत तयार
आणा गडे भराभरा फुलापानांचा आहेर

आजोबांच्या रुमालाचा, केला बघा अंतर्पट
भट जेवून उठले, पोटे फुगलेली तट्ट !

बेसनाच्या लाडवाचे, करा बरं समभाग
माझ्या भाऊरायाचा ग ! आहे नाकावर राग !...



# रुसकी चिमणी

रुसकी चिमणी, रडत राही
सारखं डोळ्यांतून, पाणी येई

चिमण्याचं मन घट्ट होतं
रडणं, रुसणं, जाणत नव्हतं

मग चिमणी, रागावून म्हणे
" बरे संसार ( घरटे ) सोडुन जाणे "

तिनं त्याला,.लावला बोल,
" माझे आसू कवडीमोल "

चिमण्यानं वेड, पांघरलं
चिमणाबाईना विचारलं

" पाण्याचा टॅक्स झालाय सुरू
आसवांचं बिल, कुठं जाऊन भरू ?.... "

# सहल

उन्हाळ्याच्या सुटीत, मजाच झाली !
घरातिल सारी, सहलीला गेली

बाळू नि बंडू, बाबा नि आई
आजोबा, आजी अन् आत्याबाई !

फराळाचा बेत, पाव नि लोणी
चटणीच्या वासानं, जिभेला पाणी !

फतकल घालून, बंडू बसला
खेकडा त्याच्या, मांडिला डसला

पायावरती, भरतीचं पाणी
अधिकच खारट, लागलं लोणी

चटणीवर उडाली, वाळूच वाळू,
पक्के चिडले, बंडू नि बाळू



इतक्यात आली, पावसाची सर
सामान उचला, भराभर

अस्सा झाला, सहलीचा थाट !
चालू लागा, घराची वाट !

तोंडातल्या तोंडात, आजी बोलली,
" दातांची कवळी, तिथंच राहिली, "

आत्यानं केला, एकच गिल्ला,
" माझा बटवा, वाहून गेला ! "

आइनंही, तक्रार मांडली,
" घराची चावी, कुठतरि सांडली ! "

आजोबांचा, राग भारी,
म्हणाले " पोरं, मोजा सारी.... "

रागातच ते गाडीत बसले,
बाबा फक्त, गालात हसले,

अशी काही, मजा झाली
घरातिल सारी, सहलीला गेली....





# नाटक

राजूनं एक नाटक केलं,
आख्ख्या चाळीला आमंत्रण दिलं.

नाटकाचा विचार झाला
" गड आला पण सिंह गेला ! "

फळकसुद्धा रंगला !
दारावरती टांगला !

राजू झाला शिवाजी-राजा
नाटकात आली मजाच मजा !

बेबी झाली जिजाबाई,
तिला भाषण म्हणायची घाई !

केताला केला तानाजी
म्हणाला मीच जिंकिन बाजी !

उदय, उदय-भानू झाला
मोडकी बंदुक, आणखी भाला,

गुंड्याला शेलारमामा केला
छोट्या रायबाला घेऊन आला.

सर्वांना सारंच पाठ होतं
कोणी काय व्हायचं ते ठरतच नव्हतं.

तरिही नाटक झालं सुरू
पोरं लागली मारामारी करू.

" अरे ! मी शिवाजी ! तू कुठला ?
उदय बंदुक घेऊन उठला !

" राजू दिसतो भलताच बावळा, "
गुंड्या त्याच्या अंगावर धावला.

" जिजा जशी काळी घूस ! "
" गुंड्या नाकाचा शेंबुड पूस— "

चड्डी सावरित राजू गर्जे,
गुंड्याला चांगला चोपला पाहिजे.

अशी नाटकात आली मजा

सारेच राजे, पण नव्हती प्रजा.
जिजा भाषण विसरली,

ऐनवेळी घसरली,

आपसांत चर्चा झाली सुरू
" आतां दुसरंच नाटक करूं.... "

# म्हातारी

एका म्हातारीचं, वय आहे शंभर
मान आहे ताठ ! पण वाकलीय् कंबर

तरी ती म्हातारी, घरकाम करते
भाताची रास, गुटुगुट्ट गिळते !

तिला होती मुलं, नातवंडं झाली !
नातवंडं सुद्धा, म्हातारि होऊन मेली !

तशी ती म्हातारी, धीरानं वागते,
नातू मेला त्याचं, " वय झालं " म्हणते.



# म्हातारी


एका म्हातारीचं, वय आहे शंभर
मान आहे ताठ ! पण वाकलीय् कंबर

तरी ती म्हातारी, घरकाम करते
भाताची रास, गुटुगुट्ट गिळ्ते !

तिला होती मुलं, नातवंडं झाली !
नातवंडं सुद्धा, म्हातारि होऊन मेली !

तशी ती म्हातारी, धीरानं वागते,
नातू मेला त्याचं, " वय झालं " म्हणते.





# कोकिळेचं बाळ

रानातल्या कोकिळेला, बाळ झालं छान !
जन्मताच ते मारू लागलं तान !

डोंगरावरच्या कोल्होबानं ऐकली तान
घरट्याच्या दिशेनं, उंचावली मान

तिथं त्यांना, गंमत दिसली !
पशुपक्ष्यांची, पंगत बसली

वाळक्या पानांचे, बनवित ( भाजित ) पापड
चुलीशी बसलं होतं माकड

देवघरात होती टिटवी
फुलापानांनी, पूजित सटवी

फारच कामात होता उंदिर
बांधित होता गणपती मंदिर

म्हणे, " गणेश, नवसाला पावला
कोकिळाताईला, मुलगा झाला ! "

नटून थटून, आली चिमणी
शोभत होती, राजाची राणी

हातात लोटी, घेऊन खार
ओतित होती तुपाची धार

जेवणावर उडत होत्या माशा
म्हणतात " आम्ही बाळाच्या मावश्या "

कोल्ह्याच्या तोंडाला, पाणी सुटलं
आणि त्यानं, साऱ्यांना म्हटलं,

" मी तर तुमचा सख्खा भाऊ
बाळाला आणिन, खेळ नि खाऊ

झाडाखाली, बसवाल पंगत
तरच येइल खरी गंमत ! "

म्हणाले पशू, पक्षी सारे,
" तुम्ही आमचे वडीलधारे

चांदोबाला आमंत्रण, देऊन या,
बारशाचं जेवण, जेवून जा.... "



# आमची मावशी

आमची मावशी, तापट मोठी,
सदान् कदा, कपाळाला अठी,

अंगावर येते, वसावसा,
सारखी म्हणते " अभ्यासाला बसा "

आमची मावशी, म्हणते कशी ?
" ज्यानं त्यानं आपली बुवा कपबशी "

कामाचा सपाटा, तोंडाचा पट्टा,
एकेकाच्या पाठीत, एकेक रट्टा !

तिचं जर पुन्हा, बारसं झालं तर—
नांव ठेवू " मावशीबाई भडकंकर "



# न्हावी दादा

न्हावी दादा, या या,
केसांचं जंगल कापुन घ्या

डोईवर झाल्य केसांचं रान
म्हणतात " बोकड दिसतोय् छान !"

केस कापायचा कंटाळा येतो
खेळण्याचा वेळ फुकट जातो

केस कापायची मोडावी चाल
आई म्हणते, " वेण्या घाल "

आजोबाचं टक्कल बघून
मी तर हरलो विचार करून

देवतरी दुष्ट मोठा
त्यांना देतो चम्मन गोटा,

मला मात्र केसांचं रान !
म्हणतात " बोकड दिसतोय् छान !"


विंदा करंदीकर
परी ग परी
मातीची गाय
निर्मला देशपांडे




Library IIAS, Shimla
MR 028.5 D 459 P
00055450